## ५. न्याय मंडळ

### १. उच्चन्यायालय

प्र. उच्चन्यायालयाची रचना सांगून अधिकार लिहा / स्पष्ट करा.

उत्तर :- भारतीय राज्यघटनेतील सहाव्या भागात प्रकरण पाच व सहा मध्ये कलम २१५ ते २३१ मध्ये राज्याच्या न्यायमंडळासंबंधी सविस्तर तरतूद केलेली आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयाची असते. न्यायालय कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवले जाते. न्यायालय कायदेमंडळ व कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते.

महाराष्ट्रात उच्चन्यायालय त्याची खंडपिठे, जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालय व कनिष्ठ न्यायालय यांचे एकत्रीकरण करून एकेरी न्याय-व्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रातील उच्चन्याया-लयाला मुंबई उच्चन्यायालय हे नाव आहे. मुंबई उच्चन्यायालय महाराष्ट्रासाठी अंतिम न्यायालय असते.

मुंबई उच्चन्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा दर्जा प्राप्त आहे. अभिलेख न्यायालय म्हणजे असे न्यायालय, ज्या न्यायालयाचे निर्णय प्रमाणभूत समजले जातात. कोणत्याही कनिष्ठ न्यायालयात उच्च न्यायालयाचे निर्णय व त्याचे कागद पत्रे प्रमाण समजली जातात.

मुंबई उच्चन्यायालय

खंडपिठे

↓

नागपूर | औरंगाबाद | पणजी

↓

जिल्हा न्यायालय

कनिष्ठ न्यायालय

तालुका न्यायालय

↓

लोक न्यायालय

↓

तंटामुक्त ग्राम समिती

राज्य घटनेतील कलम 214 नुसार प्रत्येक घटकराज्याला एक उच्चन्यायालय असेल. 1956 सातव्या घटना दुरुस्ती नुसार भारताची संसद एकापेक्षा जास्त घटक राज्यासाठी एकच उच्चन्यायालय स्थापन करु शकते. त्यानुसार महाराष्ट्र आणि गोवा घटकराज्यासाठी एकच उच्चन्यायालय आहे ते म्हणजे मुंबई उच्चन्यायालय होय.

मुंबई उच्चन्यायालयाची नागपूर, औरंगाबाद व पणजी येथे तीन खंडपिठे आहेत. न्यायदान उशिरा करणे म्हणजे न्याय नाकारल्यासारखेच असते. मुंबई उच्चन्यायालय दीव, दमण व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशासाठी देखील कार्यरत आहे.

* रचना :
मुंबई उच्चन्यायालयाची रचना राज्यघटनेतील कलम् २१८ नुसार खालील प्रमाणे सांगण्यात आलेली आहे.

१) न्यायाधिशांची संख्या :-
मुंबई उच्चन्यायालयात एक मुख्यन्यायाधीश असतो. व भारताचे राष्ट्रपती वेळोवेळी ठरवतील त्या प्रमाणे न्यायाधिशांची संख्या ठरत असते राज्याची लोकसंख्या, कार्याचा व्याप व भूभागाचा विस्तार अशा अनेक गोष्टी विचारात घेऊन राष्ट्रपती न्यायाधीशांची संख्या ठरवतो.

२) नेमणूका :-
उच्चन्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांच्या नेमणूका भारताचे राष्ट्रपती करतात. यावेळी उच्चन्यायालयातील मुख्यन्यायाधिशांची नेमणूक करताना राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाचा सल्ला घेतात. तसेच उच्चन्यायालयातील इतर न्यायाधीशांच्या नेमणूका करताना राज्यपाल व उच्चन्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला सल्ला घेतला जातो. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१७ नुसार उच्चन्यायालयाची न्यायाधीश म्हणून

न्यायालयाची पात्रता :-
१) तो भारताचा नागरिक असावा.
२) भारतात कमीत कमी १० वर्ष न्यायदानाचा अनुभव असावा.

३) कोणत्याही उच्चन्यायालयात १० वर्ष वकिली केलेली असावी.
४) राष्ट्रपतीच्या मते तो कायदेपंडित असावा.

* उच्चन्यायालयाचा कार्यकाळ :-

भारतीय राज्यघटनेत उच्चन्यायालयाच्या न्यायाधिशांच्या निवृत्तीचे वय ६० वर्ष होते. परंतू १५ व्या घटना दुरुस्ती नूसार त्याचे वय ६२ वर्ष करण्यात आले तसेच २०१० साली न्यायमूर्तिंच्या निवृत्तीचे वय ६५ वर्ष करण्याचा प्रस्ताव मान्य आला.

खालील काही कारणांमुळे न्यायाधिशांचे पद रिकामे होते.
१) स्वतः च्या हस्ताक्षराने, राष्ट्रपतीच्या नावाने राजीनामा पाठविल्यास.
२) सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त झाल्यास.
३) इतर राज्यातील उच्चन्यायालयात मुख्य न्यायाधीश म्हणून बढती मिळाल्यास.
४) राज्यघटनेतील कलम १२४ चार नूसार गैर वर्तन किंवा अकार्यक्षमतेच्या कारणावरुन राष्ट्रपतीच्या आदेशाने कार्यवाही करुन काढून टाकल्यास.

* शपथविधी :-

भारतीय राज्यघटनेतील कलम २१९ नूसार उच्चन्यायालयाच्या न्यायाधिशाला आपले पद स्विकारण्यापूर्वी राज्यपाल गोपनियतेची व संविधानाची शपथ देतो.

याशिवाय राज्यघटनेतील कलम 221 एक नुसार उच्चन्यायालयातील न्यायाधिशांना वेतन व भत्ते दिले जातात. त्यांच्या कार्य काळात सेवा काळात दिलेल्या वेतनात घट करता येत नाही. उच्चन्यायालयाच्या न्यायमूर्तींना निवृत्तीनंतर फक्त सर्वोच्च न्यायालयातच वकीली करण्याची परवानगी आहे. त्यासोबतच तो ज्या उच्चन्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केली नाही अशा उच्चन्यायालयात वकीली करु शकतो. एखादा मुख्यन्यायाधीश निवृत्त झाल्यास काही कारणास्तव त्याचे पद रिकामे झाल्यास कामकाजाच्या सोयीसाठी म्हणून कलम 223 नुसार राष्ट्रपती त्याच न्यायालयातील एखादया न्यायमूर्तींची प्रभावी न्यायाधीश म्हणून नियुक्ती करु शकतो.

* उच्चन्यायालयाचे अधिकार :-

भारतीय राज्यघटनेतील कलम 205 नुसार उच्चन्यायालयाचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहेत. या कार्यक्षेत्राची व अधिकाराची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्य, गोवा राज्य आणि दमण, दिव व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशासाठी आहे.

महाराष्ट्रातील उच्चन्यायालयाच्या अधिकाराची विभागणी खालीलप्रमाणे करता येते.

1) प्रारंभिक अधिकार क्षेत्र :-

प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणजे ज्या खटल्याचा प्रारंभ उच्चन्यायालयात होतो.

त्या खटल्यासंबंधीचा अधिकार प्रारंभिक अधिकार क्षेत्रात येतो. तसेच एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाकडे दाखल न करता थेट उच्चन्यायालयात दाखल करता येतो. हे त्या खटल्याचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणून ओळखले जाते. प्रारंभिक अधिकार क्षेत्रात खालील घटकांचा विचार होतो.

1) मूलभूत अधिकारासंबंधीचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र :-

मुंबई उच्चन्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात नागरिकांच्या मुलभूत अधिकाराचे रक्षण करण्यासंबंधीच्या खटल्याचा समावेश होतो. नागरीक आपल्या मुलभूत अधिकारांवर अतिक्रम झाल्यास उच्चन्यायालयाकडे दाद मागवतात. भारतीय राज्यघटनेतील कलम 226 ने हा अधिकार दिला आहे. या अधिकारात फक्त दिवानी दाव्यांच्या समावेश होतो. मुंबई उच्चन्यायालयाला अपील शाखा व मुळ न्यायशाखा म्हटले जाते.

2) निवडणूकी संबंधीची याचिका चालविणे :-

महाराष्ट्राच्या उच्चन्यायालयाला निवडणूकी संदर्भातील याचिका चालवण्याचा अधिकार आहे. या अधिकाराचा समावेश प्रारंभिक अधिकार क्षेत्रात होतो. केंद्रीय अथवा राज्य विधीमंडळाच्या कोणत्याही सभागृहावर निवडून गेलेल्या सभासदांच्या निवडी संदर्भातील खटले फक्त उच्च न्यायालयालाच दाखल करता येतात.

२) कायद्याची वैधता तपासणे :
१) राज्यविधीमंडळाने केलेल्या कायद्यांची राज्यघटनेनुसार योग्यता तपासण्याचा उच्चन्यायालयाला अधिकार आहे. या अधिकाराचा समावेश प्रारंभिक अधिकार क्षेत्रात होतो.
२) पूर्ननिर्णयाचे अधिकारक्षेत्र मुंबई उच्च न्यायालय, महाराष्ट्र, गोवा, दिव, दमण, दादरा हवेली या सर्वांसाठी पूर्न निर्णयाचे सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णया विरुद्ध उच्च-न्यायालयात दावा दाखल करता येतो. उच्चन्यायालयात दिवानी, फौजदारी व महसूली असे तीनही प्रकारचे खटले दाखल करता येतात. याशिवाय विक्री कर (Sentax), आयकर (incometax) या संबंधीचे दावे देखील उच्चन्यायालयात दाखल केले जाऊ शकतात.

जिल्हान्यायालयाने दिलेल्या निर्णय विरुद्ध आपणास थेट सर्वोच्च न्यायालयाकडे जाता येत नाही. त्यासाठी आपणास उच्चन्यायालयाकडे दाद मागावी लागते.

ज्या खटल्याचा निर्णय लघुवाद न्यायालयाने (Small, Cause, Court) ने दिलेला आहे. तो खटला पूर्ननिर्णयासाठी उच्चन्यायालयाकडे आणता येत नाही सत्र न्यायालयाने (Session Court) सत्रन्यायालयाने एखादया मृत्यूदंडाची शिक्षा दिली असेल. तर तो खटला पूर्न निर्णयासाठी उच्चन्यायालयात पाठविला पाहिजे, असे बंधन आहे. उच्चन्यायालयीन संबंधी दिल्याशिवाय कोणालाही मृत्यूदंडाची शिक्षा दिली शकत नाही.

3) राज्यातील न्यायव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे :-
राज्यघटनेतील कलम 235 प्रमाणे उच्चन्यायालयाला आपल्या अधिकार क्षेत्रातील जिल्हा न्यायालय व त्याच्या अधिन येणाऱ्या न्यायालयावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. उच्चन्यायालय या अधिकाराचा वापर खालीलप्रमाणे करावे.
1) राज्यातील कोणत्याही कनिष्ठ न्यायालयातून कागद मागवून त्याची तपासणी करणे.
2) कनिष्ठ न्यायालयातील अधिकु - अधिकु वर्गाची पद निर्मिती बदली, सुट्ट्या आणि रजा इ. बाबत उच्चन्यायालयाला अधिकार आहे.
3) कनिष्ठ न्यायालयातील कागदपत्रे कोणत्या पद्धतीने ठेवले पाहिजे यासंबंधीचे निर्देषण उच्चन्यायालय करत.
4) एखाद्या कनिष्ठ न्यायालयातून एखादा खटला काढून दुसऱ्या कनिष्ठ न्यायालयात चालविण्याचे आदेश उच्चन्यायालय देऊ शकते.
5) कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजाचे नियम बनवणे.
6) कनिष्ठ न्यायालयाच्या पूर्वीच्या नियमात बदल करणे.
7) कनिष्ठ न्यायालयातील कामकाज कोणत्या पद्धतीने व नियमाने चालवावे याचे निर्देषण करणे.

4) जिल्हा न्यायाधिशाची निवड करणे :-
राज्यपाल उच्चन्यायालयाशी विचार विनिमय करुनच जिल्हा न्यायाधिशांची निवड करते. योग्य व पात्र व्यक्तीची शिफारस जिल्हान्याया-धिकारपदी शिफारस करण्याचा अधिकार कलम

233(2) ने उच्चन्यायालयाला दिला आहे.

5) इतर न्यायाधिशांच्या नेमणूका :
उच्चन्यायालय त्यांच्या देखरेखीच्या-
ली असलेल्या खालील न्यायालयांच्या न्यायाधिशा-
च्या निवडीबाबत राज्यपालाला सल्ला देतो.
शहर दिवाणी न्यायालय अतिरिक्त
जिल्हा न्यायालय, अतिरिक्त जिल्हा न्यायालयधिश,
संयुक्त जिल्हा न्यायाधीश सहाय्यक जिल्हा न्याया-
धीश, लघुवाद न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश,
संघ न्यायाधीश, अतिरिक्त संघ न्यायाधीश व
सहायक संघ न्यायाधीश इ.

6) प्रशासकिय न्यायाधिशांचे अधिकार क्षेत्र :
शासनाने अनेक प्रशासकीय न्यायाधि-
शांची निर्मिती केली यांना त्यांच्या क्षेत्रातील वादांचे
निवाडे करण्याचा अधिकार दिला परंतु या न्यायाधि-
शाने दिलेला निर्णय अंतिम स्वरुपाचा असतो.
या न्यायाधिशावर वरिष्ठ न्यायालय
म्हणून उच्चन्यायालयाचे नियमण असते. उच्चन्यायाल-
य ही या न्यायाधीकरणाकडून कोणावर अन्याय
होणार नाही याची दक्षता घेते. या न्यायाधिकर-
णात पूर्ण स्वरुपातील न्यायालय म्हणता येत नाही
तरीही त्या त्या क्षेत्रातील नागरीकांच्या मुलभूत
अधिकारावरील संकट दूर व्हावे म्हणून अशा
न्यायालयाची निर्मिती केली आहे. या सर्व
न्यायालयावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मुंबई
उच्चन्यायालयाला आहे.

## * अभिलेख न्यायालय (Court of records) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 215 नूसार उच्चन्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा दर्जा मिळालेला असतो. मुंबई उच्चन्यायालयाला 19 व्या शतकापासूनची ऐतिहासीक परंपरा आहे त्यामुळे या न्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा दर्जा आहे. अभिलेख न्यायालय म्हणजे ज्या न्यायालयाचे निर्णय जतन केले जातात व राज्यातील इतर न्यायालयांना त्या निर्णयाचे पालन करावे लागते.

आपल्या न्यायदानात उच्चन्यायालयातील न्यायदानाचे संदर्भ देऊन निर्णय दिले जातात. याशिवाय मुंबई उच्चन्यायालयाला राज्यातील सर्व न्यायालये यांच्यावर नियंत्रण व निरीक्षण ठेवण्याचा अधिकार आहे. राज्यातील सर्वच कनिष्ठ न्यायालयांना पूर्ननिर्णयासाठी उच्चन्यायालयाकडेच जावे लागते त्यामुळे मुंबई उच्चन्यायालयाला नियंत्रणाचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

भारताच्या न्यायालयीन व्यवस्थेत मुंबई उच्चन्यायालयाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मुंबई उच्चन्यायालय एक प्रमुख व महत्त्वपूर्ण न्यायालय म्हणून ओळखले जाते. अशा न्यायालयाला भारतीय राज्यघटनेने वरील प्रमाणे सर्व अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराचा वापर करून मुंबई उच्चन्यायालय महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रित ठेवण्याचे काम करते. म्हणून भारताच्या न्यायव्यवस्थेत आवर्जून मुंबई उच्चन्या

यालयाचा अभ्यास केला जातो. तसेच न्यायदाना-च्या क्षेत्रात मुंबई उच्चन्यायालयाचा दाखला, आदर्श घेतला जातो.

* जिल्हा न्यायालय :-

महाराष्ट्रात एकुण ३६ जिल्हे आहेत. या प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र न्यायालय असते. या न्यायलयाचा एक प्रमुख न्यायाधीश असतो. जिल्हा न्यायाधिश जिल्ह्याच्या सर्वोच्च न्यायालयीन अधिकारी असतो. जिल्हा न्यायाधिशाचे जिल्ह्यातील सर्व दिवाणी व फौजदारी स्वरुपाच्या न्यायालया-वर नियंत्रण असते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 233(1) नुसार जिल्हा न्यायाधीशांच्या नेमणुका राज्यपाल करतात. जिल्हा न्यायाधिशांच्या नेमणुका व बढती करताना राज्यपाल उच्चन्यायालयाचा सल्ला घेतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम 233(2) नुसार जिल्हा न्यायाधीश होण्यासाठी खालील पात्रता असावी लागते. 1) सात वर्ष वकील म्हणून कार्य केल्याचा अनुभव असावा.

2) उच्चन्यायालयाने शिफारस करावी.

3) केंद्रशासन किंवा राज्यशासनाच्या सेवेमध्ये नसावा.

वरील पात्रता पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून निवड केली जाते.

जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश हे पद अतिशय महत्वांचे व सन्मानाचे असते. जिल्ह्याच्या न्यायदान प्रक्रियेत या पदाला सर्वोच्च स्थान असते.

जिल्ह्याअंतर्गत दिवाणी व फौजदारी स्वरुपाच्या खटल्या चा न्यायनिवाडा करण्याचे अधिकार या न्यायधीशा असतात.

1) फौजदारी खटला पूर्णतः जिल्हा न्यायधिशाकडून पाहिला जातो.

2) जिल्हा न्यायधीश जिल्ह्यातील फौजदारी न्यायालय चे प्रमुख असतात.

3) कनिष्ठ न्यायालयाकडून आलेल्या फौजदारी खटल्याची सुनावणी जिल्हन्यायाधीशा समोरच होते.

4) जिल्हा न्यायाधीश कायद्यात तरतूद केलेली कोणतीही शिक्षा देऊ शकतात. परंतू त्यांनी दिलेल्या शिक्षेला उच्चन्यायालयाने कायम करावे लागते.

5) दिवाणी दाव्यासाठी जिल्ह्याच्या जिल्हान्यायालयाला वरिष्ठ स्तर व कनिष्ठ स्तर अशी दोन अधिनस्त न्यायालये असतात. या दोन्ही न्यायाल यांना रककमेच्या आधारावर प्रकरण चालवण्याचा अधिकार असतो.

प्रत्येक जिल्हान्यायालयात प्रशासकीय कामकाजासाठी अधिक्षक / प्रबंधक व लिपीक वर्ग असतो. जिल्हान्यायालयाच्या प्रशासनाचे कार्य प्रबंधकाच्या मार्गदर्शनाखाली चालते.

जिल्हा न्यायालय जिल्हा पातळी वरील न्यायदानाच्या क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावते म्हणून या न्यायालयाला राज्यघटनेने महत्वपूर्ण वरील अधिकार दिले आहेत.

* विधानसभेचा सभापती :-
भारतीय राज्यघटनेच्या कलम 178 व 181 या कलमात विधानसभेचे कामकाज चालविण्यासाठी सभापती व उपसभापतीची तरतूद केली आहे. सभापती हे विधान सभेच्या कामकाजातील महत्त्वाचे पद आहे. सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती काम पाहतो.

1) निवड :-
सभापती व उपसभापती या दोघांची निवड विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात बहुमताने होते.

2) बडतर्फी :-
विधानसभेचा सभापती व उपसभापती विधानसभेचा पाठिंबा असे पर्यंत पदावर राहू शकतात. दोघांनाही पदावरून काढण्याचा अधिकार विधानसभेला आहे. परंतु विधानसभेने दोघांनाही 14 दिवस अगोदर रितसर सूचना द्यावी. विधानसभेत बैठक बोलावून बहुमताने ठराव पास करून बडतर्फ करता येते. या बैठकीला सभापती उपस्थित राहून (सदस्य म्हणून) आपले म्हणणे मांडू शकतो.
विधानसभा हे विसर्जित होणारे सभागृह आहे. त्यामुळे नविन विधानसभा अस्तित्वात येईपर्यंत मागील विधानसभेचे सभापतीच कायम असतात.

3) सभापतीचे अधिकार :-
लोकसभेच्या सभापतीला जे अधिकार असतात तेच अधिकार राज्याच्या विधानसभेच्या सभापतीला असतात. मुंबई विधानसभेचे सभापती पद अत्यंत सन्मानाचे व प्रतिष्ठेचे असते. सध्या हरिभाऊ बागडे हे महाराष्ट्र विधानसभेचे सभापती आहेत या सभापतीला खालील अधिकार असतात.

1) सभागृहाचे कामकाज सुरळित चालवणे.
2) विधानसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.
3) सभागृहाला शिस्त लावणे.
4) सभागृहाच्या कामकाजाची रूपरेषा ठरवणे.
5) सभागृहाची कार्यपद्धती निश्चित करणे.
6) सभागृहात दाखल झालेले विविध ठराव लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव इ. बाबत योग्य निर्णय घेणे.
7) सभागृहातील चर्चेवर नियंत्रण ठेवणे.
8) सभागृहात वारंवार होणाऱ्या गोंधळामुळे सभागृहा-चे कामकाज स्थगित करणे.
9) अधिवेशन काळात सभागृहात गोंधळ झाला. त्यावेळी अधिवेशन स्थगित करणे
10) सभागृहाच्या कामकाजाच्या नियमावलीचे पालन करणे.
11) सभागृहाच्या कामकाजाच्या नियमावलीस मान्यता देणे.
12) सभागृहाच्या कामकाजाचे पालन न करणाऱ्या सदस्यांना समज देणे प्रसंगी त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करणे.

13) पुरेशा गणसंख्ये अभावी सभागृहाचे कामकाज स्थगीत करणे
14) एखादे विधेयक धन विधेयक आहे का नाही याबाबत वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय देणे सभापतींच्या या निर्णयाला कोठेही आवाहन देता येत नाही. याचा अर्थ धन विधेयक ठरवण्याचा सभापतींचा अधिकार अंतिम असतो.
15) सभागृहात येणाऱ्या विविध विषय ठराव विधेयक इत्यादीवर चर्चा घडवून आणणे.
16) सभागृहात येणाऱ्या विविध विषय ठराव व विधेयकावर मतदान घेणे.
17) सभागृहाच्या बाहेर विविध सभासंमेलनातून सभागृहाचे प्रतिनिधित्व करणे.
18) विधानसभेने मान्य केलेले विधेयक विधान परिषदेकडे पाठविणे किंवा राज्यपालाकडे पाठविणे.
19) विधानसभेच्या सर्व समित्यांचे अध्यक्ष निवडणे.
20) विधानसभेत सदस्याला विचार मांडण्यास परवानगी देणे.
21) विरोधी पक्षाने विचारलेल्या प्रश्नासाठी मंत्र्याकडून आवश्यकते उत्तर मागविणे.
22) सभागृहाला आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणे
23) विधानसभेत एखाद्या विषयावर निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतीला असतो.

वरील प्रमाणे महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतीला म्हणजे हरिभाऊ बागडे यांना संविधानाने अधिकार दिले आहेत या अधिकारावरुन असे स्पष्ट होते की सभापती हा विधानसभेचा

सरवेसरवा असतो. महाराष्ट्राच्या कायदेमंडळातील विधानसभा या सभागृहाचे कामकाज, त्याची प्रतिष्ठा, संसदीय शासनव्यवस्था या सर्वांचे संरक्षण करण्याची जबाबदारी विधान सभेच्या सभापतीची असते.